## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

गुरूवार दिनांक १६ मार्च १९९५ रोजी झालेल्या मंडळाच्या १९९५-९६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व १९९४-९५ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक बैठकीचा कार्यवृत्तान्त.

---

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची अर्थसंकल्पीय बैठक गुरूवार दिनांक १६ मार्च १९९५ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १]श्री. मनोहर विठोबा कोकाटे, | सभापती. |
| २]श्री. अशोक लाल, | उपसभापती तथा मुख्य अधिकारी. |
| ३]श्री. सुनील कर्वे, | सदस्य. |
| ४]श्री. राजा चव्हाण, | -"- |
| ५]श्री. बाळकृष्ण धुमाळे, | -"- |
| ६]श्री. हेमंत मंडलिक, | -"- |
| ७]श्री. रविंद्र कोटकर, | -"- |
| ८]श्री. मोहन देसाई, | -"- |
| ९]डॉ. सौ. माला पाटील, | सदस्या. |
| १०]श्री. चेतन शहा, | सदस्य. |
| ११]श्रीमती सरोज कापडिया, | सदस्या. |
| १२]श्री. गजेन्द्र लष्करी, | सदस्य. |
| १३]श्री. उमाशंकर ओझा, | -"- |
| १४]प्रमुख अभियंता, म. न. पा. ह्यांचे प्रतिनिधी. | निमंत्रक. |
| १५]उपकर संचालक व निर्धारक, म. न. पा. | -"- |

खालील मान्यवर उपस्थित नव्हते.

| | |
|---|---|
| १] श्री. यादवराव कांबळे, | उपसचिव, महाराष्ट्र शासन, गृ. नि. व वि. स. विभाग, मंत्रालय. |
| २] श्री. कृष्णा गेनू कांबळे, | सदस्य. |
| ३]श्री. अब्दुल रौफ पटेल, | -"- |
| ४]श्री. रॉकी क्रास्टो, | -"- |

मा. सभापती श्री. मनोहर विठोबा कोकाटे यांनी उपसभापती तथा मुख्य अधिकारी श्री. अशोक लाल यांना मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे १९९५-९६ चे अर्थसंकल्पीय अंदाज पत्रक व सन १९९४-९५ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मांडण्याची विनंती केली.

सभेच्या सुरूवातीस उपसभापती तथा मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सर्व उपस्थितांना श्री. जे. बी. धावरे, सहमुख्य अधिकारी, दुवपु यांची ओळख करून दिली व त्यांचे सर्वांच्या वतीने स्वागत करून त्यांच्या का[illegible]स सुयश चिंतीले.

तद्नंतर मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, पुरवणी सुचीतील पृष्ठ क्र. १ ते २५ वर दिनांक १०, मार्च १९९५ रोजी झालेल्या मंडळाच्या ३० व्या बैठकीचा कार्यवृत्तान्त स्थायी करण्यासाठी सादर केला आहे.

सविस्तर चर्चेअंती पृष्ठ क्र. १ ते २५ वरील कार्यवृत्तान्त सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

मुख्य अधिकारी, दुवपु यांनी मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन १९९४-९५ चे सुधारित व सन १९९५-९६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक उपस्थितांसमोर सादर केले. सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर प्रदीर्घ चर्चा झाली. या चर्चेत सर्व उपस्थित सदस्यांनी भाग घेतला.

सदर चर्चेच्या वेळी, मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, सन १९९४-९५ चे मूळ अंदाजपत्रकानुसार एकूण जमा रू. ४८९३.१२ लक्ष अपेक्षित होती. त्यात थोडा बदल होऊन सुधारित अंदाजपत्रकास सदर अपेक्षित जमा रू. ५२२४.०० लक्ष गृहीत धरली आहे. सन १९९४-९५ जमेचे मूळ अंदाजपत्रक व सुधारित अंदाजपत्रक याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

[आकडे लाख रूपयात]

| अ. क्र. | जमेचा तपशिल. | १९९४-९५ मूळ अंदाजपत्रक. | १९९४-९५ सुधारित अंदाज. |
|---|---|---|---|
| १] | उपकर, भाडे व सेवा आकार व इतर जमे पोटी महसुली जमा. | २८४०.०५ | २६५०.१२ |
| २] | शासनाचे अनुदान, कर्ज परतफेड, व्याजफेड व हमीशुल्क यांचा परतावा व मुंबई महानगरपालिका अंशदान. | १७२४.५७ | १९८४.९८ |
| ३] | भांडवली जमा : अनधिकृत गाळेधारकांकडून दंडात्मक रक्कम गाळेधारकांकडून भाग भांडवल. | —— | ५३.०० |
| | | ४५६४.६२ | ४६८८.१० |
| ४] | अनामत रकमा [आमदार निधी रू. २०० लाख धरून] व अग्रिम वसुली. | ३२८.५० | ६३५.९० |
| | एकूण रू. | ४८९३.१२ | ५३२४.०० |

५

सन १९९५–९६ या वर्षाकरीता खालील प्रमाणे जमा व खर्च अपेक्षित धरेला आहे.

[आकडे लाख रुपयांत]

| अ.क्र. | जमेचा तपशिल. | रुपये. | खर्चाचा तपशिल. | रुपये. |
|---|---|---|---|---|
| | | | महसुली खर्च. | |
| १] | उपकर भाडे सेवा-आकार व इतर. | २९२६.७५ | १] आस्थापना | ४५९.९४ |
| | | | २] सेवाआकारातून भागवावयाचा खर्च. | ३९९.३१ |
| २] | शासनाचे अनुदान कर्ज व व्याज परतफेड नगरपालिका अंशदान. | २५६५.६४ | ३] नगरपालिका कर. | १७०.३० |
| | | | ४] चालू व खास दुरुस्ती. | ३१४.५० |
| | | | ५] व्याज व हमी शुल्क. | २९८.३० |
| ३] | भांडवली जमा अनधिकृत गाळेधारक दंड वगैरे. | ५०.०० | | |
| | | ५५४२.३९ | | १६४२.३५ |
| | | | भांडवली खर्च. | |
| | | | संरचनात्मक दुरुस्ती. | २८९५.०० |
| | | | पुनर्रचित इमारती. | १०४५.३६ |
| | | | संक्रमण शिबीरे. | १२०.५० |
| | | | अवजारे. | १०.५० |
| | | | कर्जाची परतफेड. | ३६४.४५ |
| | | | | ४४३५.८१ |
| ४] | अनामत रकमा व अग्रिम. | ४७६.०० | अनामत रकमांचा परतावा | २८२.१० |
| | | | कर्ज व अग्रिम. | ६.०० |
| | एकूण रू. | ६०१८.३९ | | ६३६६.३६ |

त्यांनी उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, सन १९९५–९६ मध्ये रू. ५३५.७७ लक्ष रुपयांनी जमेपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, संरचनात्मक दुरुस्तीचे दरात शासनाने ११ मे १९९२ पासून वाढ केलेली आहे व हा दर ५०० रू.प्र.चौ.मी. वरून ७५० रू.प्र.चौ.मी.

....४/...

१६०४

: ४ :

केलेला आहे. या वाढीव दुरूस्ती मुळे मोठ्या प्रमाणात वाढ अपेक्षित आहे. परंतु त्या प्रमाणात शासनाने आपले अनुदानात वाढ केलेली नाही. तरी शासनाने आपले अनुदान रू. १२००/- लक्ष वरून रू. २२००/- लक्ष करावे. यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा सुरू आहे.

मुख्य अधिकारी, दुवपु यांनी पुढे सांगितले की, पुढील बैठकीमध्ये ह्या पुढील पुनर्बांधणीचे कार्यक्रम हे पूर्णत: मालकी तत्वावर आधारीत करण्याच्या दृष्टीकोनातून एक टिप्पणी सादर करण्यांत येईल. तसेच मागील बैठक मध्ये बॉम्बस्फोटात व मुंबई झालेल्या दंगलित ज्या इमारतींना हानी पोहचली होती अशा इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्तीसाठी प्रमाणित मर्यादेपेक्षा जास्त येणारा खर्च शासनाच्या निर्देशानुसार मंडळामार्फत करण्याचे आदेश उपमुख्य अभियन्ता [द.] व [उ.] यांना दिले होते व त्यानुसार दोन्ही उपमुख्य अभियन्ता [द.] व [उ.] यांचेमार्फत कार्यवाही चालू आहे.

चर्चेच्या ओघाओघात मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी जुन्या इमारतींच्या दुरूस्ती आणि पुनर्बांधणीच्या खर्चात होत असलेली वाढ व शासनाकडून मिळणारे अनुदान याबाबत त्यांनी सांगितले की, मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे दुरूस्तीच्या प्राधान्यावर असलेल्या इमारतींची संख्या व त्यावर अपेक्षित खर्चबाबत अंदाजित तपशील असताना आपण शासनास त्यादृष्टीने सर्व माहिती संकलित करून पाठवावी व शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात प्लान फंडाअंतर्गत तशी तरतूद करावी म्हणजे आपणास त्यात काही सूट झाल्यास त्यानुसार आपले अधिकारी पुढील योजना हाती घेतील व सर्व चित्र स्पष्ट होईल.

यावर मुख्य अधिकारी, दुवपु यांनी मागील ३ ते ४ वर्षात झालेल्या वार्षिक खर्चाची आकडेवारी सांगितली व त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, दुरूस्ती मंडळाचा जो मागील सन १९९४-९५चा बजेट खर्च मंजूर करण्यांत आला आहे त्याचप्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे.

दुरूस्ती मंडळाच्या निधीत वाढ होण्याच्या दृष्टीने कोणते मार्ग अवलंबावेत यावर चर्चा करताना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, दुरूस्ती मंडळाच्या एकूण वार्षिक निधीतून दरवर्षी ५.०० कोटी रू. पुनर्बांधणीवर खर्च केले जातात. जर ही योजना पूर्णपणे मालकीतत्वावर केल्यास व त्यावर आलेला खर्च ना फायदा-ना तोटा [No loss no profit ] या नुसार वसूल केला तर, हे पाच कोटी रूपयाची बचत होऊ शकेल. तसेच गेली १७-१८ वर्षापासून पुनर्रचित इमारतींच्या मासिक भाड्यात वाढ केलेली नाही, तीही करणे जरूरीचे आहे. तसेच

...५..

तसेच महानगरपालिकेकडून मिळणाऱ्या अनुदानातही आजपर्यंत वाढ करण्यात आलेली नाही ती होणे आवश्यक आहे. तसेच उपकरापोटी बरीचशी थकबाकी महानगरपालिकेकडून वसूल झालेली नाही त्याबाबत वरिष्ठ पातळीवर चर्चा करून त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. यावर बोलताना मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी सांगितले की, मालमत्ता देयकांतर्गत मंडळ महानगरपालिकेस दरवर्षी दोन कोटी रूपये देते व ही रक्कम महानगरपालिकेकडून जी उपकरापोटी थकबाकी येणे शिल्लक आहे त्यातून परस्पर वळती करून घ्यावी, म्हणजे ते जे दोन कोटी रूपये आहेत ते दुरूस्तीवर वापरता येतील. तसेच निधीच्या उपलब्धतेबाबत मा. सदस्या डॉ. माला पाटील यांनी असे सुचविले की, मुंबई इमारत दुरूस्तीसाठी मंडळाच्या मुंबई बेटावर मुख्य जागी असलेल्या पुनर्रचित इमारती व संक्रमण शिबीराच्या जागेवर खाजगी कंपन्याच्या जाहिरातींसाठी बोर्ड लावण्यास परवानगी दिल्यास दुरूस्ती मंडळाला त्यातून निधी उपलब्ध होईल हा विचार सर्व सदस्यांनी मान्य केला व याबाबत मुख्य अधिकारी, दुवपु यांनी उपमुख्य अभियंता [पुनर्र] यांना मंडळाच्या सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणीकरून त्याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्यास सांगितले.

सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, याबाबत शासन स्तरावर मागील १०-१२ वर्षात महानगरपालिकेच्या ३.६० कोटी अंशदानात वाढ झालेली नाही ती व्हावी व प्रत्येकवर्षी काही टक्क्यांनी त्यात नियमित वाढ करण्यात महानगरपालिकेस सांगावे व त्यास सर्व सदस्यांनी एकमताने मंजूरी दिली.

मुंबई दुरूस्ती मंडळाच्या विविध भागांतील संक्रमण शिबिरांच्या पुनर्बांधणीबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, मुंबई दुरूस्ती मंडळांतर्गत असलेल्या संक्रमण शिबिरांची व उपलब्ध चटईक्षेत्र निर्देशांकानुसार उपलब्ध होणारे गाळे व त्यावर अपेक्षित खर्च याची माहिती संकलित करणे मुंबई मंडळाच्या वास्तुशास्त्रज्ञांच्यामार्फत चालू आहे. तसेच दुरूस्ती मंडळातील मुख्य जागी असलेल्या संक्रमण शिबिरांच्या जागी बहुमजली इमारती बांधून त्यातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून इतरत्र संक्रमण शिबिरे बांधण्याची पहाणी चालू आहे. यावर चर्चा करताना मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी सांगितले की, मागील बैठकीमध्ये यावर त्यांनी एक पर्याय सुचविला होता की, मुंबई दुरूस्तीमंडळाच्या अखत्यारित असलेल्या संक्रमण शिबिरांच्या जागा मुंबई मंडळाच्या ताब्यात देवून त्या जागेवर बहुमजली इमारती बांधून मुंबई मंडळाला वाजवी दराने खुल्या बाजारात विकेल व त्याच जागी दुरूस्ती मंडळासाठी काही ठराविक गाळे संक्रमण शिबिरासाठी बांधून देईल. त्यामुळे निधीची गरज भासणार नाही व दोन्ही मंडळे एकाच शासकीय यंत्रणेखाली कार्यरत असल्यामुळे तसा कोणत्याही खाजगी विकासकाच्या दृष्टीने देणे असे होणार नाही व याबाबत एक टिप्पणी

तयार करुन पुढील बैठकीत सादर करावी अशी त्यांनी मुख्य अधिकारी, दुवपु यांना विनंती केली व मुख्य अधिकारी, दुवपु यांनी ती मान्य केली.

सदर चर्चेत उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन दीर्घ चर्चा केली. सविस्तर चर्चेअंती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व सन १९९४-९५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक – अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकीय बैठक / २१३

पृष्ठ क्रमांक १ ते ७१ वरील मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या सन १९९४-९५ च्या सुधारित व सन १९९५-९६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

---

विषय :- पुनर्रचित विभागातील प्रस्तावांना प्रशासकीय तथा सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

मुख्य अधिकारी, दुवपु यांनी पुरवणी सुचिअंतर्गत पृष्ठ क्र. २७ ते ८५ वर पुनर्रचना विभागातील प्रस्तावांना शासकीय तथा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या खालील प्रस्तावांची थोडक्यात माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना दिली.

१] इमारत क्र. १६, १६अ, १८-२६, संत सेवा महाराज मार्ग "सी" विभाग, मुंबई या इमारतीची पुनर्बांधणी योजना.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. २७ ते ३७ वर सादर करण्यांत आलेला आहे. सदर प्रस्तावाची माहिती देतांना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, पूर्वी मंडळाने १८-२६ संत सेवा महाराज मार्ग "सी" विभाग ही योजना हाती घेतली होती व महानगरपालिकेकडून नकाशे मंजूर झाल्यावर कामास सुरुवात केलीअसता सदर योजनेच्या बाजूच्या इ.क्र. १६, १६अ संत सेवा महाराज मार्ग येथील रहिवाशांनी सदर पुनर्बांधणीचे काम थांबवून त्यात त्यांचाही समावेश करण्याची विनन्ती केली. तदनुसार इमारत क्र. १६, १६अ, संत सेवा महाराज मार्ग ही म्हाडा कलम ८८[३] अंतर्गत घोषित करून सदर योजनेत समाविष्ट करण्यांत आली आहे. त्यावर सदर पुनर्बांधणी योजनेसाठी मंडळाची सुधारित आर्थिक मंजूरी घेणे क्रमप्राप्त आहे. तरी सदर योजनेच्या रू. ७२.३६ लक्ष खर्चास मंडळाने सुधारित मंजूरी देण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून सर्वानुमते रू. ७२.३६ लक्ष खर्चास सुधारित मंजूरी देण्याचे ठरले.

---

२] इमारत क्र. ३५-डी-११-११अे-१३ मुगभाट क्रॉस लेन, "डी" विभाग, इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजुरीसाठी पाठवावयाच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत.

..........

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृष्ट क्र. ३९ ते ५३ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर बाब टिप्पणीवर चर्चा करतांना मुख्य अधिकारी, द्वपु यांनी असे सांगितले की, नविन पुनर्रचित इमारतीत एकूण ४० गाळे उपलब्ध होणार असून पूर्वीच्या जुन्या ३३ भाडेकरूंना पुनर्वसित केल्यावर मंडळास अतिरिक्त ७ गाळे उपलब्ध होणार आहेत. सदर इमारतीच्या कामास अडथळे निर्माण झाल्यामुळे काम टप्प्याटप्प्याने करण्यांत आले. आत्तापर्यन्त २८ गाळयाचे बांधकाम झाले असून महापालिकेकडून निवासी परवाना मिळविलेला आहे. उर्वरित १२ गाळयांची पुनर्बांधणी आता करावयाची असल्यामुळे पुनर्बांधणी योजनेची किंमत पूर्वीच्या प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा जास्त होत आहे व त्यामुळे एस्. पी. डब्ल्यू. मॅन्युअल नियम क्र. ३४ नुसार सुधारित प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता आहे. सदर योजनेस रू. ४२.४१ लक्ष [भूसंपादनासहित] सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सन्माननीय सदस्यांपुढ सादर करण्यांत आला आहे.

सदर प्रस्तावावर सर्व बाजूने चर्चा होवून सर्वानुमते रू. ४२.५१ लक्ष [भूसंपादनासहित] इया रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे ठरले.

---

३] इमारत क्र. ८६-१०६, ९४ अे व बी, तुकाराम भिकाजी कदम मार्ग, चिंचपोकळी, "झ" विभाग येथील "झेनाब बिल्डींग" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत.

........

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृष्ट क्र. ५५ ते ७३ वर सादर

६०४

७५

: ८ :

करण्यांत आलेली आहे. वरील व टिप्पणीच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी, दुवपु यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, उपरोक्त मालमत्तेवरील "जैनाब बिल्डिंग" मधील भाडेकरुंनी त्यांच्या दिनांक १९ सप्टेंबर १९९३ च्या निवेदनानुसार मंडळास विनन्ती केली की, त्यांच्या चाळी १०० वर्षाहूनही अधिक जुन्या असून, त्यांची संडास व गटार लाईनची व्यवस्था अत्यंत खराब झाली असून तेथे सतत दुर्गंधी पसरलेली असते. तसेच सध्या रहात असलेल्या खोल्या कमी क्षेत्रफळाच्या असल्यामुळे त्या कोंदट वातावरणात अनेक अडचणींना तोंड देत ते त्यांचा संसार कसाबसा करीत असतात, त्यामुळे त्या जुन्या चाळी पूर्णपणे पाडून मंडळातर्फे पुनर्बांधणी करण्यांत यावी. त्या अनुषंगाने मंडळाने वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक करुन पुनर्बांधणीची शक्य-अशक्यता अजमावून सदर मालमत्तेवरील इमारतींची पुनर्बांधणी योजना प्रस्तावित केली आहे. सदर मालमत्तेवरील तिन्ही इमारतींपैकी एकही इमारत दुरुस्ती मर्यादेपलिकडे घोषित केली नाही व त्या सध्या जागेवर अस्तित्वात आहेत. या जुन्या तिन्ही इमारतीत निवासी ६९ व अनिवासी ११ असे एकूण ८० भाडेकरु/रहिवाशी रहात आहेत. सदर प्रस्तावित पुनर्रचित योजनेमुळे १२४ निवासी व १२ अनिवासी असे मिळून १३६ गाळे प्रस्तावित असून जुन्या भाडेकरुंना पुनर्वसित केल्यावर मंडळास ५६ अतिरिक्त गाळे उपलब्ध होणार आहेत. तसेच या योजनेंतर्गत एकूण ११०३.६८ चौ.मी. एवढा भूभाग प्राधिकरण कायद्याच्या ४१[१] कलमाखाली संपादित करावयाचा आहे. तरी सदर योजनेसाठी रु. १६१.५६ लक्ष एवढया रकमेस प्रशासकिय मंजूरी व म्हाडा अधिनियम ४१[१] कलमाखाली संपादन करण्यासाठी शासनास पाठवावयाच्या प्रस्तावास मंजूरी देण्यासाठी सदर प्रस्ताव सादर केलेला आहे.

वरील प्रस्तावावर प्रदिर्घ चर्चा होवून सर्वानुमते सदर योजनेसाठी रु. १६१.५६ लक्ष एवढया रकमेस प्रशासकीय मंजूरी व म्हाडा अधिनियम ४१[१] कलमाखाली भूमि संपादन करण्यासाठी शासनास पाठविण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्याचे ठरले.

---

४] इमारत क्र. ३३७ फर्ग्युसन रोड जी दक्षिण विभाग, गणपत राव कदम मार्ग, मुंबई.

........

सदर विषयाची वाब टिप्पणी पृष्ठ क्र. ७५ ते ८५ वर सादर करण्यांत

गितले

ाज

ग

ाची

३६

७८

लिली आहे. सदर बाब टिप्पणीवर चर्चा करतांना मुख्य अधिकारी, दुवपु यांनी सांगितले की, विषयांकीत इमारत ही म्हाडा अधिनियम ८८[३] अंतर्गत घोषित करण्यांत आलेली असून सदर इमारतीचे नकाशे सन १९९४ मध्ये महानगरपालिकेने मंजूर केलेले आहेत. जुन्या इमारतीत २८ निवासी व ५ अनिवासी असे एकूण ३३ भाडेकरू/रहिवाशी आहेत. नविन पुनर्रचित इमारतीत ७८ निवासी व ५ अनिवासी असे एकूण ८३ गाळे उपलब्ध होणार आहेत. जुन्या भाडेकरूंना नविन इमारतीत पुनर्वसित केल्यावर मंडळास ५० गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. तरी सदर योजनेच्या बांधकाम खर्चास रू. ९८.३३ लक्ष एवढया रकमेस आर्थिक मंजूरी देण्यासाठी सदर प्रस्ताव सादर केलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकीत इमारतीच्या पुनर्बांधणीसाठी रू. ९८.३३ लक्ष या रकमेस आर्थिक मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

---

ठराव क्रमांक :- अर्धसैन्याळीय बैठक/२१४

खालील प्रस्तावांच्या योजनेस प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली.

| योजनेचे नांव | प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मंजूरी. |
|---|---|
| १] इ.क्र. १६, १६अ, १८-२६ संत सेना महाराज मार्ग, "सी" विभाग, मुंबई. | रू. ७२.३६ लक्ष खर्चास सुधारित मंजूरी देण्यांत आली. |
| २] इ.क्र. ३५-डी-११-११अे-१३, मुगभाट क्रॉस लेन, "डी" विभाग, मुंबई. | रू. ७२.११ लक्ष [भूसंपादनासहित] इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यांत आली. |
| ३] इ.क्र. ८६-१०६, ९४ अे व बी, तुकाराम भिकाजी कदम मार्ग, चिंचपोकळी "ई" विभाग येथील "क्षेनाब बिल्डींग" | रू. १६१.५६ लक्ष एवढया रकमेस प्रशासकीय मंजूरी व म्हाडा अधिनियम ९१[१] कलमाखाली भूमि संपादन करण्यासाठी शासनास पाठविण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली. |
| ४] इ.क्र. ३२७ फर्ग्युसन रोड, जी दक्षिण विभाग, गणपत राव कदम मार्ग, मुंबई. | रू. ९८.३३ लक्ष या रकमेस आर्थिक मंजूरी देण्यांत आली. |

---

ब] ग/द विभागातील करी रोड येथील भूकर क्रमांक १८६ वरील १२२-१२४-१२६ "खोजा चाळ" येथील नियोजित इमारतीच्या पुनर्बांधणी अंतर्गत पाईल फौंडेशन [आर.सी.सी. बोअर पाईल] कामाच्या निविदा मंजूर करण्याबाबत.

.............

उपरोक्त विषयाची बाब टिप्पणी पृष्ठ क्रमांक ८७ ते ९३ वर सादर करण्यांत आलेली आहे. सदर विषयावर चर्चा करतांना मुख्य अधिकारी, दुवमु यांनी सांगितले की, पृष्ठ क्र. ९३ वर निम्नतम बोली रक्कम ५५,८६,७५३/- अशी चुकीने लिहिली गेलीअसून त्याऐवजी सदर निम्नतम बोली रक्कम रु. ५५,०६,८६८.७० अशी आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, विषयांकित पुनर्बांधणी योजनेस मंडळाने दि.२३.६.८८ रोजी झालेल्या तांत्रिक समितीच्या ४० व्या बैठकीत रु.१२९.८० लक्ष एवढया रकमेस प्रशासकीय मंजूरी दिली आहे. त्यानुसार सदर योजनेच्या प्रस्तावित नकाशांना व अंदाज-पत्रकांना महापालिकेकडून मंजूरी मिळालेली आहे. आता सदर योजनेचे काम सुरू करण्याचे ठरलेअसून प्रस्तावित पुनर्रचित इमारतीचे पाईल फौंडेशनचे काम प्रथम हाती घेण्यांत येणार आहे व तद्नुसार जोत्यावरील काम करण्यांत येणार आहे. सदर पाईल फौंडेशनच्या कामाच्या रु.४९.६३ लक्ष एवढया रकमेस तांत्रिक मंजूरी दिलीअसून निविदा पत्रकाच्या मसुदयास मुख्य अभियंता/ प्रा.[मुं.] यांनी रु.४७.२६ लक्ष या रकमेस मान्यता दिली आहे.

तद्नंतर सदर कामाच्या निविदा मागविण्यांत आल्या. एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या. त्यातील मे.विरल बिल्डर्स यांनी निविदा रकमेच्या म्हणजेच ४७,२६,९२६ रु.च्या वर १८.१९ टक्के अधिक भरलेली होती. मे.विरल बिल्डर्स यांना सदर वाढीव टक्केवारीबाबत वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले व त्यानुसार त्यांना १८.१२ टक्के वरून १६.५० टक्के पर्यन्त कमी करून काम करण्याची तयारी दर्शविली आहे. तरी मंडळास निविदा रक्कम ४७,२६,९२६ वर १६.५० टक्के अधिक [रु.५५,०६,८६८.७०] भरलेल्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्यासाठी सादर करण्यांत आलेली आहे.

सदर बाबत उपस्थित सन्माननीय सदस्यांनी सविस्तर चर्चा करून सविस्तर चर्चेअंती मे.विरल बिल्डर्स यांनी भरलेल्या निम्नतम बोली रकमेस ४७,२६,९२६ वर १६.५० टक्के अधिक [५५,०६,८६८.७०] मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

29

ठराव क्रमांक :- अर्थसंकल्पिय बैठक/२१५

मुंबई बेटावरील करीरोड येथील भूकर क्रमांक १८६ वरील १२२-१२४-१२६ "खोजा चाळ" येथील नियोजित इमारतीच्या पुनर्बांधणी अंतर्गत पाईल फौंडेशन [आर.सी.सी. बोअर पाईल] कामाच्या निम्नतम निविदेची बोली रक्कम ४७,२६,१२६ वर १६.५० टक्के अधिक [५५,०६,८६८.७० रु] या रकमेस मान्यता देण्यात आली.

---

३] दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्ती कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा प्रस्ताव पृष्ठ क्र. १५ ते २११ वर सादर करण्यांत आलेले आहेत. सदर प्रस्तावाची सविस्तर माहिती मुख्य अधिकारी, दुवपु यांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांना दिली व सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत आले असल्याचे सांगितले. सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक :- अर्थसंकल्पिय बैठक/२१६

दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या परिशिष्ट "अ" मधील सर्व अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यात आली.

---

४] उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती

23

कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे प्रस्ताव पृष्ठ क्र. ३०१ ते ४३१ वर सादर करण्यांत आलेले आहेत. सदर प्रस्तावाची सविस्तर माहिती मुख्य अधिकारी, दुमपु यांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांना दिली व सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यांत आले असल्याचे सांगितले. सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरूस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक :- अर्धसंकल्पिय बैठक/२१७

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरूस्ती कामांच्या परिशिष्ट "ब" मधील सर्व अंदाजपत्रकांना मंजूरी देण्यांत आली.

---

५] अध्यक्षांच्या परवानगीने घ्यावयाचे आयत्यावेळेचे विषय.

मा. सदस्य श्री. सुनील कर्वे यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, मागच्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, जरघरमालक त्यांची इमारत "ना हरकत प्रमाणपत्र" विना परतावा अंतर्गत स्वत: दुरूस्त करत असतील तर मंडळाच्या निधीची बचत होईल व इमारत सुस्थितीत राहील व याबाबत मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना सहकार्य घ्यावे. याबाबत त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, मंडळाचे काही अधिकारी तांत्रिक जाचक अटी घालून ती दुरूस्ती थांबवितात. वानगी दाखल त्यांनी इ. क्र. ६२५ जे. एस्. एस्. रोड ही इमारत घरमालक स्वत: दुरूस्ती करत आहे. महानगरपालिकेने ही त्याचे नकाशे १९९४ मध्ये मंजूर केलेले आहेत. त्यांना आता आपल्या ८३-८४ च्या कार्यकारी अभियंता दुरूस्ती विभाग यांनी काम बंद करण्याची स्थगिती नोटीस त्यांच्यावर बजावली आहे व ते काम बंद केले व त्याबाबत त्यांनी तीव्र खेद व्यक्त केला. याबाबत मुख्य अधिकारी, दुमपु यांनी संबंधित उपमुख्य अभियंता [द.] श्री. सुराणी यांना याबाबत सविस्तर माहिती अनुपालन अहवालांतर्गत सादर करण्याचे निर्देश दिले.

पूर्तता
उपमुख्य अभियंता
[दक्षिण]

तद्नंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. सभापती/दुवपु यांनी पुढील बैठकीची वेळ व दिनांक आगाऊ कळविण्यांत येईल असे सांगून सभा समाप्त झाल्याचे जाहिर केले.

सही/-
नि. काअ. / दुव पु.

सही/-
उपसभापती व मुख्य अधिकारी, दुवपु.

सही/-
सभापती, दुवपु.

मंडळाच्या दि. १६.३.९५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दक्षिण परिमंडळातील
प्रस्तावास मंजूरी दिलेल्या अंदाज पत्रकांचा तपशिल

[दक्षिण परिमंडळ]

| अ.क्र. | विभाग | इमारतीचे नांव क्रमांक रस्त्याचे नांव | दुरुस्तीचा टप्पा / मंडळ/नाह्प | मजल्यांची संख्या / रहिवाशांची संख्या | क्षेत्रफळ / दर / चौ.मी. | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम | रु. ७५०/-चौ.मी. मर्यादेप्रमाणे प्रशासकिय मंजूरीसाठी प्रस्तावित केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | बी | २८-३० न्यू बंगालीपुरा स्ट्रीट [अमीदानी बिल्डींग] | दुसरा / मंडळ | तळ + ३ / १८ + ६=२४ | ७१२.०० / ७१६.५० | ५१०१४२/- / ४९५०५७/- | ४९५०५७ /- |
| २. | सी१-२ | ५ अली उमर स्ट्रीट [इस्माइल बिल्डींग] | दुसरा / मंडळ | तळ + २ / ४ + २ =६ | १७३.०० / ६२४.७९ | १०८०९० /- / ८७२६३ /- | ८७२६३ /- |
| ३. | सी१-२ | ८०-८२ सैफी ज्युबिली स्ट्रीट [हुसेन कुंड चाळ, मुं. ३] | पहिला / मंडळ | तळ + ४ / १२+ ४=१६ | ५४९.०० / ४०१.७८ | २२०५८१/- / २२०५८१/- | २२०५८१/- |
| ४. | बी | ८७झकेरीया मस्जिद स्ट्रीट [मन्सूरी मोहम्मद बिल्डींग] | तिसरा / मंडळ | तळ + ३ / १२+०=१२ | ४१८.०० / ७४८.९८ | ३१३०७५/- / २३०३२५/- | २३०३२५ /- |
| ५. | डी-१ | १६८ ए/सी, बाबासाहेब जयकर मार्ग | तिसरा / मंडळ | तळ + २ / २=१३ | ५२२.५७ / ७०५.७३ | ३६८७९७/- / २८२७९७/- | २८२७९७ /- |
| ६. | बी | १४ ए, मिर्झा अली रोड २०-२०, ए, २० बी. जेल रोड [करसनदास चाळ[फ्लावत | दुसरा | + २ / ८ + १=९ | ३३६.०३ / ७९८.४३ | ३६८२९८/- / ३१६०७८/- | ११९८०२.५० |
| ७. | सी१-२ | ७१ अली उमर स्ट्रीट | तिसरा / मंडळ | तळ + ४ / ८ + १=९ | २२७.३५ / ७२३.५० | १६४५१८/- / १२३७३६/- | १२३७३६/- |

२/-

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | बी | ३३-३३ए, ताडिल स्ट्रीट [दक्षिण] खोजा, मुस्लिम ट्युबरक्युलासीस ट्रस्ट बिल्डिंग | दुसरा<br>मंडळ | तळ + ४<br>२२+१=२३ | ७६९.०३<br>७५१.०५ | ५७७५७९ /-<br>३८२४१५ /- | १६०८.५० |
| ९. | बी | ५-५, ए धोबी-स्ट्रीट तवावाला बिल्डींग | दुसरा<br>मंडळ | तळ+३+४ अज्ञात:<br>७+४=११ | ७१७.३८<br>५१२.३० | ३६७५०९/-<br>२५८७७७/- | ७७/- |
| १०. | सी-३-४ | १८८-१९४डॉ. व्हिगास स्ट्रीट मुंबई-२ | पहिला<br>मंडळ | तळ + ३<br>३+१=४ | ४७४.७०<br>३७८.७२ | १७९७७८/-<br>१७९७७८/- | १७९७७८ /- |
| ११. | सी१-२ | ४६दुमरी कारपेंटर स्ट्रीट, पुनीत भवन | तिसरा<br>मंडळ | तळ+२+३ [अज्ञात:]<br>५+३=८ | ४७७.५२<br>६२६.३५ | २११०१७/-<br>२१४५९७/- | २१४५९७ /- |
| १२. | सी१-२ | १३पहिली कारपेंटर स्ट्रीट | तिसरा<br>मंडळ | तळ+ २<br>१४+४=१८ | ३९६.००<br>८२३.८४ | ३२६२४४/-<br>२०११६३/- | १७९११९ /- |
| १३. | डी-२ | ५७ई आणि एच, अली खत्तर-गल्ली, क्रॉस लेन, रेळे बिल्डींग | दुसरा<br>मंडळ | तळ+२+३ [अज्ञात:]<br>८+२=१० | ४००.३९<br>६८४.०९ | २७३१०१/-<br>१८२६०१/- | १८२६०१ /- |
| १४. | डी-२ | ३३९ डॉ. डी. बी. मार्ग | तिसरा<br>मंडळ | तळ+३<br>२४+३०=५४ | २०१३.४४<br>७९२.२३ | १५, ९५, १००/-<br>६८००६७ /- | ५९५०४७ /- |
| १५. | अ | २३नगीनदास मास्टर रोड | तिसरा<br>मंडळ | तळ+४<br>३०+२८=५८ | ३४६०.६०<br>४७६.२८ | १६४८२३१/-<br>५७८२५१/- | ५७८२५१ /- |

३/—

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६. | सी ३-४ | २७ तिसरी सरीन स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ + ४ / ८+४=१२ | ३८१.५० / ११४८.२२ | ४३८०४९ /- / २४७३२०/- | १५३९६ /- |
| १७. | --"-- | ४६-४८ चंपा गल्ली, लक्ष्मी-रामदास बिल्डींग | तिसरा / मंडळ | तळ + ५ / ३+५=८ | ४६८.०० / ७३६.१३ | ३४४५१०/- / २७०२७०/- | २७०२७०/- |
| १८. | बी | १-१३ निशानपाडा रोड | तिसरा / मंडळ | तळ+२+३ / १२+७=१९ | ३३ / ७४ | २५१३३८/- / १८९३३८/- | १८९३३८/- |
| १९. | | १५९-१६२ जंजीकर स्ट्रीट | पहिला / मंडळ | तळ + ३ / ३+४=७ | २९८ / ६१ ३५ | ११९८४९/- / ११९८४९/- | ११९८४९ /- |
| २०. | | ३ दुसरी कोळी लेन | पहिला / मंडळ | तळ+ २ / ६+०=६ | ७.१५ / १.१६ | ८२५६३/- / ८२५६३/- | ८२५६३ /- |
| २१. | | १८८-१९२ बाबासाहेब जयकर मार्ग | दुसरा / मंडळ | तळ +४ / १०+३=१३ | .३८ / ५५५.४० | ५५८८३२/- / ३२२२९३/- | ३२२२९३/- |
| २२. | सी-१-२ | २१ पहिली कारपेंटर स्ट्रीट | पहिला / मंडळ | तळ+ २ / ७ +३=१० | २६४.८७ / ५५०.९३ | १४५९२५/- / १४५९२५/- | १४५९२५/- |
| २३. | सी-३=४ | ३७ ताडवाडी | तिसरा / मंडळ | तळ +२ / ११+३=१४ | २८३.८९ / ६३१.६६ | १७९३२३/- / १०२५५४/- | १०२५५४ /- |

४/--

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४. | सी-३-४ | ६९-७१ चंदनवाडी कल्याणजी लालजी चाळ | चौथा | तळ +१ | ११५९.०० | ६२४[illegible] /- | २७७००१ /- |
| | | | मंडळ | ४७+११=५८ | ५३८.५९ | २७७००१ /- | |
| २५. | सी१-२ | १०४ घोगारी मोहल्ला ईशाबाई हुलेमान दिनानाथ प्लेट | दुसरा | तळ+४ | ३९५.५० | २५८८४६/- | १५८१२० /- |
| | | | मंडळ | ७+३=१० | ६५४.४७ | १५७१२०/- | |
| २६. | -"- | १५ दुसरा मोईवाडा, तापीबाई मेन्शन | पहिला | त + ४ | २२९.९३ | ३४१२३०/- | १७२४४७ /- |
| | | | मंडळ | ३+४=४ | १४८४.०८ | ३४१२३०/- | |
| २७. | -"- | १६९ सा[illegible]पुरा स्ट्रीट, दुधवाला | तिसरा | तळ+३ | १०२२.०० | १०११३९३/- | ८८६१५ /- |
| | | | मंडळ | [illegible] | ९९९.६२ | ३३३५०८ /- | |
| २८. | सी [illegible] | [illegible]११अहादिव शंकर शेठे, रोड भारत भुवन | चौथा | [illegible] | १६६५.०० | १०९३४६४/- | ३०८६५८ /- |
| | | | मंडळ | [illegible]=५० | [illegible].७३ | ३०८६५८/- | |
| [illegible] | सी | २ [illegible] क्रॉस लेन, [illegible]वाला बिल्डींग | पहिला | [illegible] | ३४६.६४ | २२३३४५/- | २२३९४५ /- |
| | | | मंडळ | ६+३=९ | ६४४.३० | २२३३४५/- | |
| ३० | सी१-२ | १५०-१५२ डॉ. [illegible]हिमतुरा मार्ग | दुसरा | तळ +१ | २१४.३९ | १६५६०६/- | १११९४३.५० |
| | | | मंडळ | ४+२=६ | ७८७.१४ | १२७७५७/- | |
| ३२ | सी२-४ | १९, दुसरी कुंभारवाडी, कृष्ण निवास | तिसरा | तळ+३+४ अधा. | ६५८.९६ | ४९३५७७/- | १३८३४० /- |
| | | | मंडळ | ८+ ७=१५ | ७४९.०२ | १३८३६०/- | |
| ३१ | सी१-२ | ४४-४८ढब्बू स्ट्रीट, लकडावाला बिल्डींग | पहिला | तळ +४ | ६०७.७८ | ४००१८६/- | ४००१८६ /- |
| | | | मंडळ | [illegible]+३=१० | ६५८.४४ | ४००१८६/- | |
| ३३. | डी-१ | ३०१, ए-बी, राजाराम मोहनराय मार्ग | तिसरा | तळ + ३ | १३५४.२० | ८९७५३४ /- | ६४०४५० /- |
| | | | मंडळ | ३४+०=३४ | ६६२.७८ | ६४०४५० /- | |

५/---

| | | | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | बी | १०१/१०७ भंडारी स्ट्रीट किंवा १०४/११२ गुंजीकर स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ + ३ / २०+-१३=३३ | १३११.५५ / ७४६.४२ | ९८४९४०/- / ७२१०३०/- | ७२१०३०/- |
| ३५ | डी-१ | १४ बी मंगलवाडी, स्नेहसदन | पहिला / मंडळ | तळ + ७ / ३१+-१=३२ | ११९८.१७ / २१५.५३ | ४१३४२९/- / ४१३४२९ - | ४१३४१९/- |
| ३६ | सी-३-४ | २२०/२२४ काळबादेवी रोड, मुं. २, [ कुब्जा बिल्डींग] | दुसरा / मंडळ | तळ + ५ / २+-८=१० | ४६३.८० / ६५५.४७ | ३०४०११/- / २४५४७९/- | २४५४७९/- |
| ३७ | डी-१ | १११/११३ राजाराम मोहनराय मार्ग, सुरेश सदन कॉन्ट्रक्टर बिल्डींग | तिसरा / मंडळ | तळ + ३ / २६+-५=३१ | १२७०.०० / ६७३.५९ | ८५४८१८/- / ४८४१८७/- | ४८४१८७/- |
| ३८ | सी-३-४ | १२६, डॉ. सिताराम पोतदार मार्ग जगन्नाथ चाळ | तिसरा / मंडळ | तळ + २ / ३१+-०=३१ | १४१४.४८ / ६२२.४८ | ९७९४९७/- / ७२९९३९/- | ७२९९३९/- |
| ३९ | -"- | ६ बी, वेलिंग्टन स्ट्रीट | दुसरा / मंडळ | तळ + २ / ३२+-२=३४ | ९८५.७५ / ७१३.५३ | ७३५८९३/- / ६५७४८१/- | ६५७४८१/- |
| ४० | डी-१ | १ अवंतिकाबाई गोखले मार्ग | तिसरा / मंडळ | तळ + ४ / १६+-८=२४ | १५२४.१८ / ७९५.२१ | ११११ ०५०/- / ४५६४५०/- | ३८७५३५/- |
| ४१ | सी-१-२ | ४२=४४ धोगारी मोहल्ला हवाबाई मंझिल | तिसरा / मंडळ | तळ + ४ / १७+-२=१९ | ४७१.०० / ७९५.२६ | ३४७५७०/- / २२६६५०/- | २०५५३०/- |
| ४२ | बी | २५४ नागदेवी स्ट्रीट | तिसरा / मंडळ | तळ + ४ / १६+-४=२० | ८४६.२० / ७४५.८७ | ६२९६६८/- / २९४६६८/- | २९४६६८/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | सी-१-२ | १६ याकूब स्ट्रीट , नळबाझार | दुसरा<br>मंडळ | तळ +- ४<br>९+-३=१२ | ३१०.००<br>६७८.१२ | ३१०४६७/-<br>१७१२२२८/-= | १७१२२८/- |
| ४४ | बी | २४२-२४६ नागदेवी स्ट्रीट<br>[ आदम मंझील] | तिसरा<br>मंडळ | तळ+-५+-६[अंशत:]<br>३३+-१०=४३ | १४१२.००<br>६२६.३८ | ८८४४६/-<br>३८९४४६/- | ३८९४४६/- |
| ४५ | सी-१-२ | २२-२४ पहिली कारपेंटर स्ट्रीट | दुसरा<br>मंडळ | तळ+-३+-४[अंशत:]<br>३४+-४=३८ | १२१४.१०<br>४२४.७१ | ५१५६४४/-<br>२७२८२४/- | २७२८२४/- |
| ४६ | सी-१-२ | १५०-१५२ ढब्बू स्ट्रीट<br>कागलवाला बिल्डींग | दुसरा<br>मंडळ | तळ+- ५<br>६+-१=७ | ७४३.५१<br>६१३.५० | २७१६५१/-<br>२३९७९६/- | २३९७९६/- |
| ४७ | सी-१-२ | ५८-५८ अ पहिली कारपेंटर स्ट्रीट | दुसरा<br>मंडळ | तळ +-२<br>३+-२=५ | ३३८.१५<br>४२२.५६ | १४२८८७/-<br>१२०१९०/- | १२०१९०/- |
| ४८ | -"- | खेतवाडी बँक रोड | चौथ्या<br>मंडळ | तळ +-३<br>६०+-२०=८० | २१०६.००<br>७४२.१४ | २१५६६७२/-<br>८५८०४२/- | ८५८०४२/- |
| ४९ | -"- | २४८-२५८, इब्राहिम रहिमतुल्ला रोड | चौथा<br>मंडळ | तळ +- ३<br>२९+-६=३५ | १५२१.८४<br>७४०.७१ | ११२७२५४/-<br>४१५२६६/- | ४१५२६६/- |
| | | सुधारित अंदाजपत्रके | | | | | |
| ५० | बी | ४४-४६ नाडिल स्ट्रीट [द] | दुसरा[सु]<br>मंडळ | तळ +- २<br>१४+-२=१६ | ५३९.३६<br>७६२.७२ | ४११३८३/-<br>३७४३१६/- | २५८४०/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | डी-१ | पहिली अवकलकोट लेन | दुसरा [सु.] मंडळ | तळ+-२+-३[अंशतः] ४+-२=६ | २९३.३० / ९३३.६६ | २७३८४४/- / २३४८५४/- | ११३११९/- |
| ५२ | बी | ८९-९१ झकेरिया मस्जिद स्ट्रीट | तिसरा[सु.] मंडळ | तळ+-४ / २०+-६=२६ | ९२१.१५ / ७४०.६८ | ६८२२७०/- / ४७२४०१ | १८०५८१/- |
| ५३ | सी-१-२ | २७ पहिली कारपेंटर स्ट्रीट | दुसरा[सु.] मंडळ | तळ+- ३ / १९+-२=२१ | ४५६.७३ / ७०९.९० | ३२४२३१/- / ९२१४८५/- | ५७६६१/- |
| ५४ | डी-१ | ४८-५८ पंडित डामले पथ मुगभाट क्रॉस लेन | दुसरा[सु.] मंडळ | तळ+-२ / १८+-९=२७ | ९१४.३५ / ७३८.०६ | ६७४८४८/- / ५७५८४९/- | २२७९१४/- |
| ५५ | सी-३-४ | सोनापूर स्ट्रीट, मोती मेन्शन | तिसरा[सु] मंडळ | तळ+-४ / ११+-३=१४ | ५०५.९५ / ७४६.७२ | ३७७८०६/- / २११३१०/- | २११३१०/- |
| ५६ | डी-१ | ५८ डाडीलकर रोड | तिसरा[सु] मंडळ | तळ+-३ / ३३+-१३=४६ | ११०५.०० / ८२३.५८ | ९१००६२/- / ६१६४३३/- | १६१२७१/- |
| ५७ | डी-२ | ३१ पारेख स्ट्रीट [ सरस्वती सदन] | दुसरा[सु] मंडळ | तळ+-४ / १०+-०=१० | ११८३.२२ / ७४२.४९ | ८७८५२९/- / ७३७१७६/- | ४९२५५०/- |
| ५८ | बी | ७-११ ओल्गा स्ट्रीट, पुनावाला बिल्डींग | तिसरा[सु] मंडळ | तळ+-४ / २५+-३१=५६ | १९४०.८० / ७४९.९६ | १४५५५२९/- / १२१४९७८/- | २६५३९०/- |
| ५९ | डी-२ | २९३ मौलाना शौकत अली रोड | तिसरा[सु.] मंडळ | तळ+४ / १७+-८=२५ | ३२३२.६४ / ४९९.३९ | १६१४३५७/- / १०११७३९/- | ३४६११७/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६० | सी-१-२ | २०८-२३० बारा इमाम रोड | दुसरा [सु]<br>मंडळ | तळ+३<br>१०६+३६=१४२ | ४०१६.२१<br>१४००.६१ | ५६२५३०३/-<br>५१७३०५८/- | २६१२९८६.३० |

ना हरकत प्रमाणपत्रांतर्गत अंदाजपत्रक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | सी-१-२ | ८ नानुभाई देसाई रोड मंधाबाई बिल्डींग | दुसरा<br>नाहप्र | तळ+३+४<br>२०+८=२८ | १०२०.६४<br>१२५७.०२ | १२८२९६७/-<br>११३८८६४/- | ६२१२७७/- |
| ६२ | डी-२ | २५ सी कालाराम स्ट्रीट सुलेमान बिल्डींग | दुसरा<br>नाहप्र | तळ+२<br>१८+०=१८ | ७६५.२१<br>९५२.४९ | ७२८८५५/-<br>६१३४०२/- | ४५८४५४/- |
| ६३ | डी-२ | २८३ ग्रान्ट रोड, लक्की बिल्डींग | दुसरा<br>नाहप्र | तळ+३<br>७+३=१० | ३६०.००<br>१५६१.६६ | ५६२१९६/-<br>४८०१९६/- | १८८०००/- |
| ६४ | बी | २०/२० बी जेल रोड [उत्तर] करतनदास वाळ | पहिला<br>नाहप्र | तळ+२<br>११+१०=२१ | ४५६.९४<br>९३५.९० | ४२३०८४/-<br>४२३०८४/- | ३४२७०५/- |
| ६५ | बी | ११३ केशवजी नाईक रोड सरस्वती सदन | पहिला<br>नाहप्र | तळ+५<br>८०+२३=१०३ | ४०००.००<br>२५६.१३ | १०२४५३०/-<br>१०२४५३०/- | १०२४५३०/- |
| ६६ | सी-३-४ | ४७५ जे. एस. एस. रोड कृष्णा भुवन | दुसरा<br>नाहप्र | तळ+३ मजले<br>३+२=५ | ३६८.४८<br>८०७.५० | २९७५४७.००<br>२६४२३१.०० | २४३०४४/- |

परिशिष्ट " ब "

दिनांक १६-३-१९९५ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अर्थसंकल्पिय बैठकीत मंजूर करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकाची यादी. [ उत्तर परिमंडळ]

| अ.क्र. | विभाग | वर्गवारी | इमारतीचे नांव | दुरुस्ती टप्पा / मंडळ ना.इ.प्र | मजले भाडेकरू नि+-अनि. =एकूण | क्षेत्रफळ चौ.मि. / दर चौ.मी. खर्च रू. | अंदाजपत्रकाची एकूण रक्कम / निव्वळ टप्प्याची रक्कम. [रुपये] | बैठकीत मंजूरीसाठी प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम. [रुपये] | शे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
| १. | ई-१ | अ | इमारत क्र.३५-अे, म्हातारपाखाडी रोड, माझगांव | दु.टप्पा / मंडळ | तळ+-२ / ३+-०=३ | २२७.१५ / ७३३.४२ | १,६६,५९६.०० / १,३३,८२०.०० | १,३३,८२०.०० | |
| २. | -"- | अ | इमारत क्र.१८, नारियल वाडी आर.बी. मार्ग, घोडपदेव | प.टप्पा / मंडळ | तळ+-१ / ४+-०=४ | २६९.६० / ६३९.१३ | १,७२,३११.०० / १,७२,३११.०० | १,७२,३११.०० | |
| ३. | -"- | अ | इमारत क्र.५८-५८अे, म्हातारपाखाडी रोड, परमार बिल्डींग | दु.टप्पा / मंडळ | तळ+-२ / १३+-१=१४ | २८३.२३ / ७३३.५२ | २,०७,७५४.०० / ९९,३८९.०० | ९९,३८९.०० | |
| ४. | -"- | अ | इ.क्र.४९, कॉपर स्मिथ [इब्राहिम मॅन्शन] | ति.टप्पा / मंडळ | तळ+-३ / १६+-०=१६ | ४५४.१० / ८००.६१ | ३,६३,३९९.०० / १,५४,०६५.०० | १,५४,०६५.०० | |
| ५. | -"- | अ | इ.क्र.५, बेलवेद्र रोड | चौ.टप्पा / मंडळ | तळ+-१ / १७+-०=१७ | ११६५.०० / ४०२.३३ | ४,६८,७१८.०० / १,९२,२४०.०० | १,९२,२४०.०० | |
| ६. | -"- | अ | इ.क्र.११४-अे रामनगर डॉ.बा.आ.रोड भायखळा | ति.टप्पा / मंडळ | तळ+-१ / ५२+-२२=७४ | २१२०.५० / ५८९.४७ | १२,४९,९८४ / ६,०९,२५८.०० | ६,०९,२५८.०० | |
| ७. | -"- | अ | इ.क्र.८२-८४ इस्माईल हसन लाकडावाला, हुजुरिया स्ट्रीट | दु.टप्पा / मंडळ | तळ+-३ / ३०+-२=३२ | ६२९.९२ / ७२४.९३ | ४,५६,६४८.०० / ३,०५,७५५.०० | ३,०५,७५५.०० | |
| ८. | -"- | अ | इ.क्र.५१-५५ टॅंक प[illegible] रोड | चौ.टप्पा / मंडळ | तळ+-२ / १३+-[illegible] | ६६४.०० / ७३९.३२ | ४,९०,९१४.०० / १,८७,६६९.०० | १,८७,६६९.०० | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | लाकडावाला, हुजुरिया स्ट्रीट | मंडळ | ३०+-२=३२ | ७२४.९३ | ३,०५,७५५.०० | ३,०५,७५५.०० | |
| ८. | —"— | अ | इ.क्र. ५१-५५ टॅंक प... रोड | वो. टप्पा | तळ+-२ | ६६४.०० | ४,१०,९१४.०० | १,८७,६६९.०० | |
| | | | | मंडळ | १३+-६ | ७३९.३२ | १,८७,६६९.०० | | |

— २ —

| १. | २. | ३ | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | ई-२ | अ | इ.क्र. ७-९, ना. म. जोशी मार्ग | ति. टप्पा | तळ+ १ | १५७०=३८ | रु. १०, ३१, ५२८=०० | रु. ६, ०७, ०४५=०० | |
| | | | | मंडळ | ५१+६=५७ | रु. ६५४=७८ | रु. ६, ०७, ०४५=०० | | |
| १०. | —"— | अ | इ.क्र. १८६-१९० दादर बिल्डिंग बाप्टी मार्ग. | वो. टप्पा | तळ+४ | २१५८=३१ | रु. २०, ७०, १६८=०० | रु. ७. ३४, ६९१=०० | |
| | | | | मंडळ | १२०+२१ =१४१ | ६५५=४६ | रु. ७, ३४, ६९१=०० | | |
| ११. | क/ग[द] | अ | कोहिनूर मिल चाळ नं. १२, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव. | प. टप्पा | तळ+२ | २२१=८९ | रु. १, ६५, ७६०=०० | रु. १, ६५, ७६०=०० | |
| | | | | मंडळ | ५+१=६ | ६७४७=०४ | रु. १, ६५, ७६०=०० | | |
| १२. | कग[द] | अ | इ.क्र. १९७-१९७-अ, शेनॉय बिल्डिंग, कर्गुसन रोड. | ति. टप्पा | तळ+१ | ६६२=०० | रु. २, ५७, ६०३=०० | रु. २, ११, ३०३=०० | |
| | | | | मंडळ | १३+१३=२६ | रु. ३८१=१३ | रु. २, ११, ३०३=०० | | |
| १३. | —"— | अ | अहमद सेलर बिल्डिंग क्र. ३, ज्योतिबा फुले रोड, दादर. | दु. टप्पा | तळ+२ | १३५२=०० | रु. ३, ४५, ८८८=० | रु. २, १७, ४६०=०० | |
| | | | | मंडळ | ३७+८=४५ | रु. २५५=८३ | रु. २, १७, ४६०-०० | | |
| १४. | —"— | अ | इ.क्र. १३३-१४७, सुलतान मेन्शन न्यू प्रभादेवी रोड, एलफिन्स्टन | पाचवा टप्पा | तळ+२ | रु. २७७९=०० | रु. २०, ५०, २२१=०० | रु. ७, १२, ४५१=०० | |
| | | | | मंडळ | ६९+२२=९१ | रु. ७३७=५५ | रु. ७, १२, ४५१=०० | | |
| १५. | कग/उ/ | अ | इ.क्र. ५बी केणी बंगलो, मिया मोहम्मद छोटानी मार्ग, माहिम | प. टप्पा | तळ+१ | १७८=४४ | रु. १, ४१, ५८४=०० | रु. १, ४१, ५८४=०० | |
| | | | | मंडळ | १+०=१ | रु. ७९३=४५ | रु. १, ४१, ५८४=०० | | |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुधारीत अंदाजपत्रके | | | | | | | | |
| १६. | ई-१ | अ | इ.क्र. ४१-४७, बोमनजी हाउस कॉनरस्मिथ रोड | ति. टप्पा सुधा. | तळ+२+ अशंत:३ | १०८८=४० | रु. ७, ०४, ८०३=०० | रु. १, ३६, ११५=०० |
| | | | | मंडळ | २४+०=२४ | ६४७=५५ | रु. ४, ११, ४२३=०० | |
| १७. | =-= | अ | इ.क्र. ३७-डी, डॉकयार्डरोड | दु. टप्पा सुधा. | तळ+ २ | ४३८=५४ | रु. ४, ४२, ३४१=०० | रु. १, ६३, ५४८=०० |
| | | | | मंडळ | ११+०=११ | १००८=६७ | रु. ३, ६३, ५३०=०० | |
| १८. | -"- | अ | इ.क्र. २८७-अे, रे रोड, लोलकर मॅन्शन, माझगांव | ति. टप्पा सुधा. | तळ+३ | ५७५=०० | रु. ४, १३, २५८=०० | रु. १, २६, ०९१=०० |
| | | | | मंडळ | १३+२=१५ | ७१८=०० | रु. २, ४१, ३६०=०० | |
| १९. | -"- | अ | इ.क्र. ३९-बी रंगारी चाळे, डॉ. बॉ. ए. रोड, काळाचौकी | ति. टप्पा सुधा | तळ+ २ | १०४७=०० | रु. ७, १६, २७१=०० | रु. १, ४५, ७३०=०० |
| | | | | मंडळ | ६०+०=६० | ६८४=११ | रु. ५, ३०, ३७३=०० | |
| २०. | ई-२ | अ | इ.क्र. ६१-६३ तांबळी स्ट्रीट राजा इमारत, भायखळा. | ति. टप्पा सुधा | तळ+ २ | ५८७=०० | रु. ४, ४०, १९३=०० | रु. ४९, ८४०=०० |
| | | | | मंडळ | १७+१०=२७ | ७४९=९० | रु. २, ९७, ४१८=०० | |
| २१. | -"- | अ | इ.क्र. १४-२८ खलील मॅन्शन शेख बु-हाण कमरुद्दीन स्ट्रीट नागपाडा. | ति. टप्पा सुधा | तळ+ २ | ११८१.४६ | रु. ८, ६३, ४५६=०० | रु. १, ४७, ६३१=०० |
| | | | | मंडळ | ३५+१७-५२ | ७३०=८३ | रु. ५, ५९, ९९६=०० | |
| २२. | -"- | अ | इ.क्र. १०२, ओल्ड प्रभादेवी रोड. | ति. टप्पा सुधा. | तळ+ १ | ४५६=३२ | रु. ३, ३२, ७३७=०० | रु. १, २६, ३७९=०० |
| | | | | मंडळ | २३+१-२४ | ७२९=१७ | रु. २, ०८, ३५६=०० | |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| २३. | कग[द] | अ | इ.क्र.५३, हतन चेंबर, एन. एम. वाघ मार्ग, नागपाडा. | दु. टप्पा सुधा | तळ+२ अशांत ३ | ६४८=०३ | रु. ४, ७३, ०४५=०० | रु. १, ५४, १७१=०० |
| | | | | मंडळ | २६+०=२६ | ७२९=९७ | रु. ४, २८, ०५४=०० | |
| २४. | -"- | अ | इ.क्र.७१-८३, हसमुख बिल्डिंग आचार्य दोंदे मार्ग, परेल. | ति. टप्पा सुधा. | तळ+ ३ | ११९१=०० | रु. ८, ७९, ४०६=०० | रु. ३, ०९, ७५४=०० |
| | | | | मंडळ | ३१+७=३८ | ६८१=१८ | रु. ६, ११, ८२४=०० | |
| २५. | -"- | अ | इ.क्र. ९३ बी, तनाजल लेन, लोअर परेल. | ति. टप्पा सुधा. | तळ+ १ | १४२६=९६ | रु. १०, ५१, ३३४=०० | रु. ३, १९, ७४२=०० |
| | | | | मंडळ | ८४+०=८४ | ७३६=७६ | रु. ६, ६७, ६५४=०० | |
| २६. | -"- | ती | इ.क्र. २६३, मधुहंत, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी | प. टप्पा सुधा | तळ+ ३ | १३८७=८८ | रु. ११, ५२, ११८=०० | रु. ३, ०९, ७५४=०० |
| | | | | मंडळ | १८+९=२७ | ४८२=४८ | रु. ९, ४२, ११८=०० | |
| २७. | कग[उ] | अ | इ.क्र. ७६ हिरा हाऊस, भाऊ दाजी रोड, माटुंगा | प. टप्पा सुधा. | तळ+ ३ | १२५७-७१ | रु. ५, २३, ०५३=०० | रु. २, ५३, ३०८=०० |
| | | | | मंडळ | ३३+२=३५ | ४१५=८७ | रु. ५, २३, ०५३=०० | |
| | | | | | | एकूण | रु. ९७, ५७, ०६७=०० | रु. २४, ७४, ३९९=०० |
| | | | | | | | रु. ६५, ६४, १३४=०० | |
| | | | | | | अ + ब एकूण | रु. १९३, ९६, १४३=०० | रु. ७१, १९, २००=०० |
| | | | | | | | रु. ११२, ०८, ९३५=०० | |

जा. क्र/निकाअ/सचिवालयीन शाखा/~~२८३०~~ १८३०
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
गृहनिर्माण भवन बांद्रा [पूर्व] मुं. ५१
दिनांक :- १२/५/९५

३७३२
१२/५/९५

प्रति,

सहमुख्य अधिकारी/दु. व पु. मंडळ
उपमुख्य अभियंता [मुख्यालय/पुनर्रचना/दक्षिण/उत्तर
उपमुख्य अधिकारी [सं. शि.]/[पु. गा.]
निवासी कार्यकारी अभियंता/
कार्यकारी अभियंता सहकारी संस्था कक्ष,
दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

विषय:- दिनांक ५.४.९५ रोजी
झालेल्या ३१ व्या बैठकीचा
कार्यवृत्तांत.

महोदय,

दिनांक ५.४.९५ रोजी झालेल्या ३१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची प्रत सोबत जोडली आहे. या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल तसेच ३२ व्या बैठकीत सादर करावयाचे प्रस्ताव ७ दिवसाच्या आत सादर करावेत, ही विनंती.

आपला विश्वासू,

निवासी कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

सोबत- कार्यवृत्तांत

प्रतींची प्रत माहितीसाठी सविनय सादर.

१] मा. सभापती /मुं. इ. दु. व पु. मंडळ

२] मुख्य अधिकारी/मुं. इ. दु. व पु. मंडळ.